संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

## सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचावे - डॉ. गिरीष प्रभुणे

### विद्यापीठाचा पर्यावरण व संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार प्रदान

अमरावती –

भटके आदिवासी समाजातील सर्वांपर्यंत अजूनही शिक्षण पोहचले नसल्याची खंत क्रांतीवीर चाफेकर स्मारक समिती, पुणेचे अध्यक्ष डॉ. गिरीष प्रभुणे यांनी व्यक्त केली. विद्यापीठाचा पर्यावरण व कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृति प्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०१९ प्रदान करण्यात आला, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, पर्यावरण पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. प्रफुल्ल गवई, सदस्य श्री उत्पल टोंगो, विषयतज्ज्ञ डॉ. सुचिता खोडके, दानदात्यांचे प्रतिनिधी डॉ.व्ही.एम. मेटकर, श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूरचे प्राचार्य डॉ. संतोष ठाकरे, प्रा. गजानन रामकृष्ण भारसाकळे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम उपस्थित होते.

विद्यापीठाचा पर्यावरण पुरस्कार २०१९ श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूरचे प्राचार्य डॉ. संतोष ठाकरे यांना, तर श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०१९ प्रा. गजानन रामकृष्ण भारसाकळे यांना कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र व अनुक्रमे रूपये पंधराहजार व रूपये दहाहजार रोख असे पुरस्काराचे स्वरुप होते.

प्रमुख अतिथी डॉ. प्रभुणे पुढे म्हणाले, गाडगे बाबांच्या आदर्शावर विद्यापीठ कार्य करीत आहे. महापुरूषांचा वारसा महाराष्ट्राला लाभला असून त्यांनी समाजाला शिक्षित करण्याचे महान कार्य केले आहे. हजारो वर्षापूर्वी भारतामध्ये जे ज्ञान होते, ते लुप्त पावलेले दिसत आहे. किल्ले, गड, घाट, लेण्या, महलांसारख्या अनेक कलाकृती या देशात निर्माण झाल्यात, भारताला समृद्ध करणारे ते ज्ञान होते.

इंग्रज भारतात आल्यानंतर विद्यापीठांची स्थापना झाली; पण विद्यापीठांमधून मिळणाऱ्या शिक्षणाचा उपयोग देशाला पाहिजे तसा झाला नाही. त्यापूर्वी भारतीयांकडे जे ज्ञान होते, त्यातून भारत समृद्ध होता. ग्रामीण भागातील लोकांकडे असलेल्या ज्ञानावर आधारित उत्तम शिक्षण विद्यापीठांनी देण्याची आवश्यकता आहे. कारण विदेश पद्धतीवर आधारित शिक्षण कुचकामी ठरल्याचे दिसत आहे. आमचा विद्यार्थी शिक्षित होवून आपल्या ज्ञानाचा उपयोग गावासाठी करेल, असे स्वप्न विद्यापीठांनी पहावे. संत गाडगे बाबांनी गाडगं आणि झाडू हाती घेवून समाजाला तत्वज्ञान दिले. समाजाधिष्ठीत शिक्षण घेण्याची रचना विद्यापीठात असावी, असेही ते म्हणाले.

मनोगत व्यक्त करतांना डॉ. संतोष ठाकरे यांनी विद्यापीठाने पुरस्कार देवून गौरव केल्याबद्दल विद्यापीठाप्रती ऋण व्यक्त केले. पर्यावरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कार्य व्हावे, यासाठी महाविद्यालयाच्यामार्फत पुरस्कार सुरु करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रा. गजानन भारसाकळे यांनी रूपये दहाहजार पुरस्कार राशी समाजकार्य पुरस्काराच्या वाढीव दाननिधीसाठी दिल्याची घोषणा केली. डॉ. प्रफुल्ल गवई यांनी मनोगतातून श्री गाडगे महाराज महाविद्यालयाने पर्यावरण क्षेत्रात केलेल्या कार्याची सविस्तर माहिती दिली. डॉ.व्ही.एम. मेटकर यांनी प्रा. गजानन भारसाकळे यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्यांवर आपल्या मनोगतातून प्रकाश टाकला व पुरस्कार दाननिधी तीन लक्ष रूपयांवरुन पाच लक्ष रूपये करण्याची घोषणा केली व त्यापैकी एक लक्ष रूपयांचा धनादेश कुलगुरूंकडे सुपूर्द केला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, विद्यापीठाने सुरु केलेल्या पुरस्कारामुळे पुरस्कारकर्त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव यानिमित्ताने झाला आहे. श्री गाडगे महाराज महाविद्यालय व प्रा. गजानन भारसाकळे यांनी केलेले कार्य निश्चितपणे समाजासाठी दिशादर्शक आहे. समाजाला आपण देणे लागतो, हा संदेश पुरस्कारकर्त्यांनी आपल्या कार्यातून दिला आहे. भटक्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य प्रभुणे सरांनी केलेले आहे. या सर्वांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून समाजातील अनेक संस्था व व्यक्ती पुढे येतील आणि भारताला समृद्ध करण्यासाठी माणसे उभी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमामध्ये कर्मयोगी संत गाडगे बाबा, कै. नागोरावजी मेटकर व कै. बबनदादा मेटकर यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी करुन दिला व अतिथींचे वृक्ष देवून स्वागत केले. प्रमुख अतिथींचा शाल, श्रीफळ देवून कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. वृक्ष देवून श्री शशीकांत रोडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. संचालन डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार श्री अनिल घोम यांनी मानले.

कार्यक्रमाला व्य.प. सदस्य डॉ. संजय डुडूल, श्री सुनील मानकर, डॉ. अरुणा पाटील, अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, डॉ. अविनाश मोहरील, डॉ. मनिषा काळे यांचेसह प्राचार्य फोरमचे अध्यक्ष डॉ.आर.डी. सिकची, माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, ॲड. यदुराज मेटकर, डॉ. दिलीप काळे, डॉ. अरविंद देशमुख, डॉ. सुभाष गावंडे, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, माजी कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार आदी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २४/०२/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी